# क्विकहिल फाउंडेशतर्फे सायबर सुरक्षा जनजागृती



धुळे । (खान्देश मैदान न्यूज) : शि. वि. प्रसारक संस्थेचे कर्मवीर डॉ. पा.रा घोगरे विज्ञान महाविद्यालयाच्या संगणक विभागाचा क्विकहिल फाउंडेशन सोबत सायबर सुरक्षा जनजागृती करण्यासाठी समनजस्य करार आहे. यात क्विक हील फाउंडेशन पुणे येथील फाउंडर कैलास काटकर , अनुपमा काटकर यांच्यामार्फत सायबर शिक्षा फॉर सुरक्षा यामोहिमे अंतर्गत सायबर वॉरियर्सची नियुक्ती झाली. त्यात शुभांगी देवरे व स्नेहल रघुवंशी यांचीही निवड झाली. या विद्यार्थिनींनी शहरातील गल्ली नं.२ मधील श्री लालबागचा राजा मारुती मित्र मंडळ येथे मोबाईल सुरक्षा ,सायबर फ्रॉड, बँक फ्रॉड, सोशल नेटवर्किंग वेबसाईट वापरातील समस्या, मोबाईल प्लिकेशन, पासवर्ड सुरक्षा आणि सोशल मीडियावर होणारे सायबर गुन्हे याबाबत जनजागृतीपर माहिती दिली. याप्रसंगी माजी महापौर जयश्री अहिराव, प्रतिभा चौधरी ,भाजपा महिला जिल्हाध्यक्ष वैशाली शिरसाठ, माजी नगरसेवक कमलाकर अहिरराव , मंडळाचे अध्यक्ष पवन मराठे , विजय चौधरी, शारदा धांडे ,प्रभा परदेशी यांच्यासह नागरिक उपस्थित होते. या मोहिमेच्या समन्वयक प्रा. डॉ . स्वाती बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील विद्यार्थिनी सायबर वॉरियर्स सोबत वेगवेगळ्या शाळांत २७ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून सायबर सुरक्षेविषयी जनजागृती केली. या विद्यार्थिनींनी जिल्हाधिकारी परिसर, जिल्हा न्यायालय आवारात पथनाट्याद्वारे सायबर जनजागृती केली. या कार्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी कौतुक केले आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य एम. व्ही.पाटील तसेच संस्थेचे चेअरमन तथा आमदार कुणाल पाटील यांनी पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे.